॥ मन पिसाट माझे अडले रे ॥

गायिकाः कृष्णा कल्ले
गीतः ना. घ. देशपांडे
संगीतः यशवंत देव

मन पिसाट माझें अडले रे,
थांब जरासा, थांब जरासा ॥ धृ. ॥

वनगान रान गुणगुणले रे,
दुरात दिवे मिणमिणले रे,
मधुजाल तमाने विणले रे,
थांब जरासा, थांब जरासा ॥ १ ॥

गगनात चमकले तारे,
झुडुपात काजवे सारे,
हें झोंबत आले वारे रे,
थांब जरासा, थांब जरासा ॥ २ ॥

ही खाली हिरवळ ओली,
कुजबुजून बोलू बोली,
तिमिराची मोजू खोली रे,
थांब जरासा, थांब जरासा ॥ ३ ॥

नुसतेच असें हे फिरणे,
नुसतेच दिवस हे भरणे,
नुसतेच नको हुरहुरणे रे,
थांब जरासा थांब जरासा ॥ ४ ॥